अब्दुल सत्तार एधी

अमीना अजफर



अब्दुल सत्तार एधी

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



सिंध प्रांताच्या पूर्वेला भारतात गुजरात राज्य आहे. तेथील *काठियावाड* जिल्ह्यात *बंतवा* नावाचे शहर आहे. *अब्दुल सत्तार एधीं*चे वडील, *अब्दुल शकूर एधी* आणि आई *हव्वा बाई* याच शहरात राहात होते. अब्दुल शकूर हे *मेमन* या व्यापारी समाजाचे होते. कुटुंबातील इतरांसारखेच, अब्दुल शकूरदेखील साधेसरळ आयुष्य जगत आणि पैशांची बचत करत.

अब्दुल सत्तार एधी यांचा जन्म 28 फेब्रुवारी 1928 रोजी झाला. काही वर्षांनी, त्याची बहीण *झुबैदा* आणि भाऊ *अझीझ* यांचा जन्म झाला. ही भावंडेसुद्धा आपल्या आईवडिलांसारखेच साधे जीवन जगत असत. ते जमिनीवर कापसाची गादी टाकून झोपत असत. रोज सकाळी अब्दुल सत्तार कपाटाच्या वर ठेवलेली भांडी खाली काढून ठेवत असे. रात्री जेवण उरकल्यावर आईने भांडी घासून स्वच्छ केली की तो पुन्हा ती भांडी कपाटाच्या वर ठेवत असे. त्यातील एक भांडे ते कधीच वापरत नसत. अब्दुल सत्तार आपले पैसे त्यात साठवत असे. लहानपणीच तो काटकसर करायला शिकला होता.



एधीच्या वडिलांना कामानिमित्त अनेकदा दौऱ्यावर जावे लागत असे. दरवेळी दौऱ्यावरून परतल्यावर ते एधीच्या डोक्याचे मुंडण करत असत. त्यामुळे एधीला *चपाती* असे नाव पडले. कदाचित, त्याचे टक्कल पाहून लोकांना चपाती आठवत असेल.

एधी खट्याळ होता. मित्रांसोबत तो शेजाऱ्यांच्या खोड्या काढत असे. वेगवेगळ्या प्राण्यांचे आवाज काढून तो त्यांना घाबरवत असे. कधीकधी तो इतर मुलांसोबत त्यांना सर्कशीतील कसरती करून दाखवत असे.



एधीच्या आईने त्याला गरजू लोकांना मदत करण्याची शिकवण दिली होती. दररोज शाळेत जाताना ती एधीच्या हातावर दोन पैसे ठेवत असे.
एधी शाळेतून परतल्यावर...
एक पैसा स्वतःसाठी ठेव. दुसरा पैसा गरजू माणसाला दे.
अम्मी, कुठे आहेस तू?
चपाती बनवतेय. ये खायला.
मी आज पेरू विकत घेतला. घे तुला.
एका पैशातून अर्धाच पेरू मिळाला? दुसऱ्या पैशाचं काय केलंस तू?
माझ्या वर्गात एक मुलगा आहे. त्याची आई आजारी असल्यामुळे तो डबा आणत नाही. मी माझा अर्धा पेरू आणि चणे विकत घेऊन दिले त्याला.
छान केलंस बाळा.


वाचवा! साप!
साप!
साप!
एकदा काही खोडकर मुले एका मानसिक आजारी माणसाला त्रास देत होती. हे दृश्य एधी झाडामागून बघत होता.
त्याला त्रास देऊ नका. त्याने तुमचं काय बिघडवलंय?
तू कोण आहेस? काय समजतोस स्वत:ला? त्याचा पालक?
मग ती मुले त्या माणसाला सोडून एधीला मारू लागली.


जखमी एधीने कशीबशी सुटका करुन घेतली आणि तो घरी पोहोचला.
त्या गरीबाला मुलांपासून वाचवलंस तू. त्याच्यासाठी काही खायला घेऊन जा.
खाऊन झाल्यावर त्या माणसाने एधीसाठी प्रार्थना केली: *तुझ्यावर देवाची कृपा राहो आणि तुझं नाव दूरदूरपर्यंत दुमदुमत राहो.* या घटनेनंतर, गरीब आणि दु:खी लोकांबद्दल एधीला अधिक सहानुभूती वाटू लागली.
चौथी उत्तीर्ण झाल्यावर एधीने शाळा सोडली. वयाच्या 11 व्या वर्षी तो एका कपड्यांच्या दुकानात काम करू लागला. तिथे आणखी चार मुले काम करत होती. एधीला मासिक पाच रुपये वेतन मिळत असे. त्यातील चार रुपये आईला देऊन तो एक रुपया साठवत असे.
सगळी मुले दुकानातील केर-कचरा काढत. ते कपड्यांचे गठ्ठे घेऊन घरोघरी विकायला जात. कारण बुरखा परंपरेमुळे स्त्रिया घरातून बाहेर पडत नसत.
हे रेशमी कापडातलं एक गज कसं देणार?
हे खास म्हैसूरमधून मागवलंय. एका गजाला किमान 10 रुपये पडतील.

दुकानाचा मालक एधीच्या कामाचा आणि प्रामाणिकपणाचा आदर करत असे. यामुळे इतर मुले एधीचा मत्सर करू लागली. एकदा त्यांनी मालकाकडे तक्रार केली, “एधी कपडे चोरतो आणि.......

काही काळानंतर, एधीने ही नोकरी सोडली आणि आईच्या इच्छेनुसार तो पुन्हा शाळेत जाऊ लागला. त्याला अभ्यासात चांगली गती होती. तो शाळेत इंग्लिशही शिकला आणि चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. एकदा तो मित्रांसोबत सिनेमा बघायला गेला – त्याचा आयुष्यातील हा पहिलाच सिनेमा.

नंतर बरेच दिवस, एधीचे मित्र त्या सिनेमाचे संवाद म्हणून दाखवत.
किती रमणीय! माझ्या हृदयाला गावंसं वाटतं....
घडी-घडी, मेरा दिल धडके....
....वडे खाऊ!
मला भूक लागलीय. मी चाललो घरी.
चपात्या, तुला खाण्याशिवाय काही सुचतच नाही. मला या रमणीय वातावरणात छान बासरी वाजवावीशी वाटतेय.
बांसुरी बजाना चाहता हूँ.

शाळेच्या अभ्यासाने एधीचे मन उबून गेले. मग वयाच्या 13 व्या वर्षी त्याने शाळा सोडली. मोठे झाल्यावर काय व्हायचे, असा विचार त्याच्या मनात येत असे. स्नान करताना असे विचार करायला त्याच्याकडे बराच वेळ असे.

मी रस्त्यावर माचीस विकेन आणि पुरेसे पैसे जमल्यावर मी कंपनीचे शेअर विकत घेईन. माझी अर्धी कमाई मी गरीबांवर खर्च करेन. मी गरीबांसाठी आणि अपंगांसाठी हॉस्पीटल आणि घरे उभारेन.

एधीने शाळा सोडली. पण त्याला पुस्तके वाचायचे वेड लागले. त्याने *मार्क्स, लेनिन* आणि हजरत *अबू झर घफ्फारी* यांच्या विचारांबद्दल वाचले. त्याने इस्लामी इतिहासातील *करबला* आणि इतर घटनांबद्दल वाचले. त्याने थोडे रशियन साहित्यही वाचले. हे सगळं त्याने ग्रंथालयात आणि गुजराती मासिकांमध्ये वाचले. तो प्रवासवर्णनेही आवडीने वाचत असे. वयाच्या 14 व्या वर्षी, त्याचा बराचसा वेळ विचार करण्यात जात असे. त्याच्या घराबाहेरच्या बाकड्यावर किंवा बाथरुममध्ये बसल्यावर त्याच्या मनात अनेक विचार येत....


मुलं माझी चेष्टा करतात. पण मी का त्यांची पर्वा करू? ते पैशाच्या मागे धावतील तेव्हा मी माझ्या दोन पायांनी सारं जग पालथं घालीन.
मी जगाच्या कानाकोपऱ्यात जाईन. पैसे नसले म्हणून काय झालं? मी चालत जाईन.
कायदे आझम *मोहम्मद अली जिना* एकदा बंतवाला आले. त्यांनी तेथील मेमन समाजाला आवाहन केले: “पाकिस्तानला या. तिथे आपले व्यवसाय सुरू करा. तमची उन्नती होईल आणि पाकिस्तानचीही उन्नती होईल.”
Muslim League
पाकिस्तान झिंदाबाद!
PAK
पाकिस्तान झिंदाबाद!
एधीचे कुटुंबीय इतर बऱ्याच लोकांसमवेत पाकिस्तानात आले.

एधीच्या कुटुंबाने *जोडिया* बाजारनजिक छुब्बा गल्लीत एक खोली भाड्याने घेतली. तेथील परिसरात मेमन समाजाचे अनेक व्यवसाय होते. एधीचे वडील म्हणत की तुम्हाला व्यापार शिकायचा असेल तर अगदी तळापासून सुरुवात करायला हवी. एधी घाऊक बाजारातून पेन्सील, काडेपेट्या आणि लहान टॉवेल आणून रस्त्याकडेला विकत बसे..

पेन्सील वगैरे विकून आलेले पैसे एधी साठवत असे. तो ते अजिबात खर्च करत नसे. कारण त्याला एक दवाखाना सुरू करायचा होता.



दरम्यान, एधीच्या आईची तब्येत खालावली. एधी बराच वेळ घरी राहू लागला. आईला घरकामात मदत करू लागला आणि त्याच्या धाकट्या भावाचीही काळजी घेऊ लागला.

1948 साली एधी दिवसा एका कपड्याच्या दुकानात काम करू लागला. संध्याकाळी बाजार बंद झाल्यावर, तो लोककल्याणकारी *बंतवा मेमन* दवाखान्यात काम करू लागला. पण तिथे फक्त मेमन समाजालाच मोफत औषधे मिळत असे. एधी हा नियम मोडत असे. तो गरीब आणि गरजू लोकांत फरक करत नसे. त्यामुळे तो मेमन समाजाचे नसलेल्या लोकांनाही औषधे मोफत वाटत असे. एकदा संस्थेच्या मंडळाच्या सभेत एधीने या भेदभावावर बोट ठेवले. त्याने मंडळाच्या वयस्कर सदस्यांवर टिका केली आणि म्हणाला....


परिणामी....
चालता हो इथून!
पुन्हा आपलं तोंड दाखवू नकोस कधी. बंतवा समाजाने तुझ्याशी सगळे संबंध तोडून टाकलेयत.
एधीच्या वडिलांनी त्याला आणखी एक सल्ला दिला.
मुला, हे लोक चलाख आणि वजनदार असतात. आता संपूर्ण बंतवा समाज तुला त्रास देईल. पण तू त्याची चिंता करू नकोस. त्याकडे दुर्लक्ष करण्यातच तुझे भले आहे.
प्रामाणिक लोक कुणाच्या उपकाराखाली दबत नाहीत. त्यांनी आपल्या व्यवसायात कुणी जोडीदार घेऊ नये.
एधी, वडिलांचा सल्ला कधीही विसरला नाही.



एधी गरीबांना मदत करण्यास नकार देत नसे. त्याला प्रवासाची आवडही होती. त्याने त्या वृद्ध नोकराला त्याच्या घरी पोहोचवलं. काही दिवसांनी त्याचे तिथे निधन झाले. मग एधी बांग्लादेशला (तेव्हाचे पूर्व पाकिस्तान) गेला. तिथे त्याचा सावत्र भाऊ राहात होता. हा एधीचा पाकिस्तानबाहेर पहिलाच दौरा होता. यामुळे त्याची प्रवास करण्याची इच्छा आणखी तीव्र झाली.

1956 साली एधीने एका पिशवीत काही कपडे, एक घोंगडी, थोडं अन्न, थोडे पैसे आणि पासपोर्ट घेतले. मग एका बसमध्ये बसून तो पाश्चात्य देशांचा दौरा करण्यास निघाला. ईराण, तुर्कस्थान, ग्रीस, बल्गेरिया आणि युगोस्लाव्हिया या देशांतून प्रवास करत त्याने अनेक युरोपीय देशांचा दौरा केला. लोक त्याला गरीब समजून नाणी दान करत. हे पैसे एधीने साठवले. कारण त्याला पाकिस्तानमध्ये एक दवाखाना सुरू करायचा होता.

युरोपातील लोक चपळ, कार्यक्षम आहेत, ते वेळेची किंमत करतात, वेळ वाया घालवत नाहीत, हे एधीने अनुभवले. कदाचित दोन महायुद्धांमुळे त्यांना आयुष्याची क्षणभंगुरता जाणवली होते.

इंग्लंडमध्ये एधीने कल्याणकारी राज्य कसे चालते, ते पाहिले. ही व्यवस्था पाकिस्तानमध्ये लागू करता येईल का? त्याला जाणवले की प्रत्येक धर्माचा एकच उद्देश असतो – मानवाचं कल्याण. इस्लाममध्ये याला *हक्कुल ईबाद* म्हणतात. आता एधीचे एकच ध्येय बनले, पाकिस्तानमधील गरीब, असहाय लोकांचे जीवन सुधारणे.


साठवलेल्या पैशातून एधीने कराचीत एक छोटासा गाळा खरेदी केला. तिथे दवाखाना उघडून तो औषधे स्वस्त दरात विकू लागला. दवाखान्याच्या वर त्याने एक प्रसुतीगृह सुरू केले, तसेच नर्सिंग ट्रेनिंग कोर्सही सुरू केला.
मुलींसाठी तीन महिन्यांचा नर्सिंग कोर्स. फी रू.150 फक्त. नर्स म्हणून मिळणाऱ्या वेतनामुळे तुम्ही आपल्या पायावर उभे राहू शकता.
नर्सिंगच्या ट्रेनिंगला आलेल्या मुलींना लक्षात आले की एधी यांना काही गोष्टींचा खूप तिटकारा आहे.
चालती हो! मला आळशी, अप्रामाणिक लोक नकोयत इथे.

आजारी, बेघर, वृद्ध लोक आणि मुले दवाखान्यासमोर येऊन बसू लागली. त्यांना बघून एधीला आपल्या असहाय आईची आठवण होत असे. हळूहळू त्याने त्यांची जबाबदारी उचलली आणि त्यांची राहाण्याची सोय दवाखान्याच्या वर केली.



त्यावेळी संपूर्ण सिंध प्रांतात फक्त पाच रुग्णवाहिका होत्या. जेव्हा एधीच्या आईला हॉस्पीटलमध्ये घेऊन जायची वेळ आली, तेव्हा रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. तिला रिक्शातून हॉस्पीटलला घेऊन जावे लागले.

एक मेमन व्यापारी अनेक दिवसांपासून एधीचे काम पाहात होता. त्याने एधीच्या दवाखान्याला 20,000 रुपये देणगी दिली. लगेच एधीने त्यातील 7,000 रुपये खर्च करून एक जुनी गाडी विकत घेतली.

एधीने या गाडीचे नाव ठेवले *गरीबांची गाडी*. ही गाडी संपूर्ण सिंध प्रांतात फिरू लागली. ही गाडी आजाऱ्यांना हॉस्पीटलमध्ये किंवा मृत व्यक्तिंना कबरस्थानात नेऊ लागली.

कुणी संकटात असेल तेव्हा तो मित्र आहे की शत्रू आहे, हे बघत नाही आपण. आपण फक्त त्याला मदत करतो.

एकदा एधीचा कट्टर शत्रू असलेल्या मेमन सेठची मुलगी घराच्या छतावरून खाली पडली. रुग्णवाहिका नसल्यामुळे त्याने एधीला आपली गाडी घेऊन येण्याची विनंती केली. एधीचे मित्र “जाऊ नको” म्हणत असतानाही एधीने त्या लहान मुलीला गरीबांच्या गाडीतून हॉस्पीटलमध्ये नेले.

या एकुलत्या एका गाडीमुळे *एधी रुग्णवाहिका सेवा* सुरू झाली. हळूहळू ही सेवा पाकिस्तानमध्ये सर्वदूर पसरली आणि देशातील सर्वात मोठी रुग्णवाहिका सेवा बनली. एधीची रुग्णवाहिका कोणत्याही दुर्घटनेच्या ठिकाणी सर्वात आधी पोहोचत असे.

एधी गरीब आणि अपंगांसाठी आधारगृह चालवण्यात खूप व्यस्त असे. सोबतच तो प्रसुतीगृह आणि दवाखानाही चालवत असे. तो खूप कमी वेळ झोपत असे. एकदा तो थकून-भागून झोपी गेला असता एक अनोळखी हाक ऐकून त्याला जाग आली....




मग त्या मुलीने, बिल्किसने, नर्सिंग कोर्समध्ये प्रवेश घेतला. एधीला ती येताना-जाताना दिसत असे. ती नेहमी प्रसन्न आणि आनंदी दिसत असे. शिवाय आपल्या कामात ती चोख होती. एधीला राग लवकर येत असे. त्यामुळे त्याच्यासोबत काम करणारे त्याला बिचकून असत. फक्त बिल्किस एधीसमोर शांत राहून हसू शकत असे. तिची उपस्थिती एधीलाही आवडत असे.
एधी खऱ्या अर्थाने जगू लागलाय आता.
अलिकडे एधीला झालंय काय? तो हसतोय काय, बोलतोय काय!
एधीने बिल्किसच्या आईला निरोप पाठवला की तो बिल्किसशी लग्न करू इच्छितो. बिल्किसशी बोलून आईने एधीचा प्रस्ताव स्वीकारला. पण बिल्किसच्या मैत्रीणी आणि काही इतरांनी तिला हे लग्न करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.
तू त्याच्या परवानगीशिवाय श्वाससुद्धा घेऊ शकणार नाहीस.
जेव्हा आम्ही नवऱ्यासोबत पिकनिकला जाऊ तेव्हा एधी तुला कबरस्तानात घेऊन जाईल.
किंवा तुला भिकाऱ्याच्या केसातल्या उवा काढायला सांगेल.
सगळ्या शंका-कुशंकाना दुर्लक्षून बिल्किसने एधीशी लग्न केले आणि ती दवाखान्याच्या वर राहायला आली.

लग्नानंतर बिल्किसने स्वतःला आपल्या पतीच्या कामात झोकून दिले. तिने साऱ्या अनाथ मुलांची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली, मग ती मुले बेघर असोत वा अपंग. अनेक मुलांना त्यांचे आईवडिल कचऱ्याच्या ढिगाऱ्यात किंवा नाल्यात फेकत असत. कदाचित त्यांची आर्थिक परिस्थिती त्या मुलांना सांभाळण्याइतपत चांगली नसे. यासाठी देशभरातील एधी केंद्रांच्या बाहेर पाळणे ठेवण्यात आले. आईवडीलांना नको असेलेले मूल ते या पाळण्यात ठेवून जाऊ लागले.

ज्या मुलांना कुणी दत्तक घेत नसत त्यांचे संगोपन आणि शिक्षण एधी केंद्रातच होत असे.
एधी फाउंडेशन अनेक क्षेत्रांमध्ये समाजकार्य करते. ही संस्था गरीब, अनाथ मुलांसाठी अनाथालय चालवते, निराधार मुलींना आसरा देते, वृद्धांना सांभाळते आणि गरीबांना मोफत भोजन देते. तसेच संस्था *एधी गाव* या संकल्पनेअंतर्गत नशेच्या आहारी गेलेल्या लोकांचेही पुनर्वसन करते.

पाकिस्तानच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये अनेक एधी केंद्रे आहेत.
एधी आणि बिल्किस तिथे जातात तेव्हा त्यांना पाहून तेथील मुलांना आनंद होतो.





एधी फाऊंडेशन आजारी, जखमी, वृद्ध आणि भटक्या प्राण्यांची काळजी घेण्यासाठी
अनेक केंद्रे चालवते.

काही दुर्घटना झाली तर एधीचे कार्यकर्ते तात्काळ लोकांना मदत करण्यासाठी तेथे धाव घेतात. *एधी रुग्णवाहिका सेवा* ही जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी रुगणवाहिका सेवा आहे. त्यांच्याकडे स्वत:ची हेलिकॉप्टर आणि विमाने आहेत.



एधी फाऊंडेशन एक कॅन्सर हॉस्पीटलही चालवते. तिथे कॅन्सर रुग्णांवर उपचार केले जातात, तसेच कॅन्सरवर संशोधनही केले जाते.

रामन मॅगसेसे पदक

अब्दुल सत्तार एधी आणि बिल्किस एधी यांना त्यांच्या समाज कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले. 1986 साली फिलीपिन्स सरकारने त्यांना **रामन मॅगसेसे पुरस्कार** देऊन सन्मानित केले. 1988 साली सोव्हिएत युनियन सरकारने त्यांना **लेनिन शांतता पुरस्कार** देऊन गौरवले. पाकिस्तान सरकारने त्यांना **निशाने-ए-इम्तियाझ** हा किताब प्रदान केला. याशिवाय, त्यांना अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

> “माझं काम अल्लाच्या प्रत्येक जीवासाठी आहे, मानवासाठी आहे तसंच प्राण्यांसाठीही आहे. मी सर्व लोकांना समान मानतो, मग तो मुस्लीम असो किंवा बिगर मुस्लीम असो, धनिक असो किंवा गरीब असो, पाकिस्तानी असो किंवा बिगर पाकिस्तानी असो, त्यांना गरज असते तेव्हा मी त्यांना मदत करतो.



एधीचा मुलांना संदेश

“आयुष्यात या चार तत्वांचे पालन करा. अल्लाच्या कृपेने तुम्हाला प्रत्येक गोष्टीत हमखास यश मिळेल: साधेपणा, प्रामाणिकपणा, मेहनत आणि वेळेचं पालन.”

अब्दुल सत्तार एधी आणि बिल्किस एधी – पाकिस्तानचे महान समाजसेवक

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते, असे म्हणतात. पण बिल्किस कधीही एधी यांची सावली धरून राहिली नाही. तिने पतीच्या खांद्याला खांदा लावून काम केले.

अब्दुल सत्तार एधी स्वत: बिल्किसबाबत म्हणतात, "बरंचसं काम बिल्किसच करते. कारण प्रामुख्याने स्त्रिया आणि मुले हेच गरीबी आणि अत्याचाराचे बळी ठरतात. त्यांना मदतीची सर्वाधिक गरज असते. अशा लोकांपर्यंत बिल्किस माझ्यापेक्षा जास्त सहजपणे पोहोचू शकते. एक स्त्री म्हणून लोकांचे दु:ख, वेदना समजून घेण्याची आणि ते दूर करण्याची संवेदना आणि करुणा बिल्किसमध्ये आहे. ती लोकांच्या समस्या चांगल्या प्रकारे समजू शकते आणि त्यांना मदत करू शकते."

बिल्किस नेहमी गणवेष घालत असे. तिला हवाई सुंदरी किंवा नर्स बनायचे होते. तिची आई नर्स होती म्हणून तीसुद्धा नर्स बनली. ती दु:खी लोकांना मदत करण्यास नेहमी पुढे असे. लहानपणी ती जखमी जनावरांची काळजी घेत असे, मृत पक्ष्यांना दफन करत असे. बिल्किसला मुलींना प्रशिक्षण देण्यात, असहाय स्त्रियांना मदत करण्यात आणि कचऱ्यात फेकलेल्या मुलांना आसरा देण्यात खूप समाधान मिळत असे.

बऱ्याचदा लोक नको असलेली अपत्ये नाल्यात किंवा कचऱ्यात फेकून देत असत. बिल्किसने प्रत्येक एधी केंद्राच्या बाहेर पाळण्याची सोय केली. पाळण्याशेजारी एक फलक लिहिलेला असतो, **"मुलांचा गळा घोटू नका. त्यांना या पाळण्यात ठेवा, जिवंत. एक पाप लपवण्यासाठी आणखी एक पाप करू नका."** आजवर बिल्किसने लाखो अनाथ मुलांचे संगोपन केले.

धन आणि प्रसिद्धी या गोष्टींनी एधी दांपत्याला भ्रष्ट केले नाही. आजही ते *मिठादर*च्या अरुंद गल्लीत एका छोट्याशा घरात राहातात आणि **"जमिनीवर राहून आभाळातल्या अल्लाचे कार्य करतात."**